

## राज्याचा धरणसाठा

रविवारी (ता. २२) सकाळी आठ वाजेपर्यंतचा धरणांतील उपयुक्त पाणीसाठा (टीएमसी)

| धरणे | एकूण क्षमता | आजचा साठा | टक्के वारी |
|---|---|---|---|
| **पुणे विभाग** | | | |
| टेमघर | ३.७१ | २.५३ | ६८ |
| वरसगाव | १२.८२ | ८.७१ | ६८ |
| पानशेत | १०.६५ | १०.०९ | ९५ |
| खडकवासला | १.९७ | १.९७ | १०० |
| पवना | ८.५१ | ७.४८ | ८८ |
| मुळशी | १८.४७ | १५.५३ | ८४ |
| चासकमान | ७.५८ | ७.३७ | ९७ |
| भामा आसखेड | ७.६६ | ५.८१ | ७६ |
| भाटघर | २३.५० | १७.२३ | ७३ |
| नीरा देवघर | ११.७२ | ८.७६ | ७५ |
| माणिकडोह | १०.१७ | ३.७८ | ३७ |
| डिंभे | १२.४९ | ९.३५ | ७५ |
| घोड | ५.४७ | १.४२ | २६ |
| उजनी* | ११७.२१ | ७४.१५ | ६३ |
| धोम | ११.६९ | ८.१३ | ७० |
| कण्हेर | ९.५९ | ८.०७ | ८१ |
| उरमोडी | ९.६५ | ७.७१ | ८० |
| कोयना* | १०५.२४ | ८४.११ | ८० |
| वारणा | २७.५५ | २२.०१ | ८० |
| राधानगरी | ७.७७ | ७.७७ | १०० |
| दूधगंगा | २३.९७ | २१.०२ | ८८ |
| **मराठवाडा विभाग** | | | |
| जायकवाडी* | १०२.६७ | ४५.६८ | ४४ |
| निम्न दुधना | ८.५४ | १.३४ | १६ |
| मांजरा | ६.२५ | ०.३५ | ६ |
| माजलगाव | १०.९८ | ०.२५ | २ |
| पूर्णा येलदरी | २८.६० | ०.०० | ० |

* उजनी, कोयना, जायकवाडीचा धरणसाठा अचल पातळीतील पाणीसाठा मिळून आहे.



पंढरपूर, जि. सोलापूर : येथे रविवारी (ता. २२) सकाळच्या प्रहरापासूनच चंद्रभागेतील स्नानासाठी वारकऱ्यांनी गर्दी केली होती. (छायाचित्र : राजकुमार घाडगे, पंढरपूर)

# वडगाव मावळ, लोणावळा येथे अतिवृष्टी

## जिल्ह्याच्या कोरडवाहू पट्ट्यात पावसाची प्रतीक्षा

**पुणे (प्रतिनिधी) :** पुणे जिल्ह्याच्या मावळ पट्ट्यामध्ये पावसाची दणका सुरूच आहे. मावळ तालुक्यातील वडगाव मावळ येथे सर्वाधिक २१० तर लोणावळा येथे १०४ मिमी पाऊस झाल्याने अतिवृष्टीची नोंद झाली आहे. पूर्व भागातील कोरडवाहू पट्ट्यात पावसाची प्रतीक्षा कायम असून, बाजरीच्या पेरण्या खोळबंल्या आहेत.

जिल्ह्याच्या पश्चिम भागात पावसाची रिपरिप सुरूच आहे. मुळशी, मावळ, भोर, जुन्नर या तालुक्यांमध्ये पावसाने हजेरी लावली आहे. रविवारी सकाळपासून ढगाळ हवामान आणि पावसाच्या सरी येत आहेत. पूर्व भागातील तालुक्यांमध्ये ढगाळ हवामान असून, एखाद दुसरी सर पडत आहे. बारामती, दौंड, इंदापूरसह पुरंदर आणि शिरूर तालुक्यांच्या बहुतांशी भागात पावसाची उघडीप कायम आहे. पावसाने समाधानकारक हजेरी न लावल्याने शिरूर तालुक्यासह जिल्ह्यात मुगाचे लागवड क्षेत्र कमी झाले आहे. कोरडवाहू क्षेत्रात पावसाअभावी बाजरीची अवघ्या ५० टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे.



रविवारी (ता. २२) सकाळी आठ वाजेपर्यंतच्या २४ तासांमध्ये जिल्ह्यात विविध ठिकाणी पडलेला पाऊस (मिलीमीटरमध्ये) : घोटावडे ३६, माले ६४, मुठे ५१, भोलावडे ५५, वडगाव मावळ २१०, कार्ला ६२, खडकाळा ३५, लोणावळा १०४, राजूर ५३, आपटाळे ५५.

# अकोले तालुक्यात पावसाचा जोर कायम

## भंडारदरा धरण भरण्याच्या मार्गावर

**नगर (प्रतिनिधी) :** अकोले तालुक्याच्या पश्चिम भागात पावसाचा जोर रविवारीदेखील कायम होता. जोरदार पावसामुळे भंडारदरा धरण भरण्याच्या मार्गावर आहे. असाच पावसाचा जोर कायम राहिला तर दोन दिवसांत मुख्य दरवाजातून विसर्ग सुरू करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या भंडारदरा धरणाच्या स्विपले मधून सुमारे १०,५०९ क्युसेकने विसर्ग सुरू करण्यात आला आहे. मुळा धरणातही पाण्याची चांगली असून धरण ५० टक्क्यांवर भरले आहे.

नगर जिल्ह्यातील बहुतांश भागात अजूनही जोरदार पाऊस नाही. पण अकोले तालुक्यातील पश्चिम भागातील घाटघर, रतनवाडी, कळसूबाई परिसराच्या डोंगर पट्ट्यात पावसाचा जोर कायम आहे. भंडारदरा धरणात रविवारी सकाळी ६ वाजता ८७ टक्के पाणीसाठा होता. धरणात दहा हजार क्युसेकने आवक सुरू असल्याने धरणातून १०, ५०९ क्युसेकने स्लिपवेमधून विसर्ग केला जात आहे. मुळा धरणात ९३४१ क्युसेकने आवक सुरू आहे. २६ टीएमसी क्षमतेच्या धरणात १३ टीएमसीपेक्षा जास्त पाणीसाठा झाला आहे. जोरदार पाण्याची आवक होत असल्याने निळवंडे धरणही रविवारी सकाळी ४३ टक्के भरले.

रविवारी सकाळी सहा वाजेपर्यंत चोवीस तासांत घाटघरला २९७, रतनवाडीला २६३, अकोल्यात ८, भंडारदरा येथे १९१, पांजरेत १९४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्याच्या अन्य भागांत मात्र पाऊस नाही.

# पुणे जिल्ह्यातील धरणांच्या पाणीपातळीत वाढ

## उजनीसह सर्व धरणांमध्ये १३१ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा

**पुणे (प्रतिनिधी) :** जिल्ह्यातील धरणांच्या पाणलोटात क्षेत्रामध्ये सातत्याने पावसाची रिपरिप सुरूच आहे. यामुळे धरणांमध्ये पाण्याची आवक होत असल्याने पाणीपातळीत वाढ होत आहे. जिल्ह्यातील धरणांची एकूण क्षमता २१६.८४ टीएमसी असून, सोमवारी (ता.२२) सकाळी आठ वाजेपर्यंत उजनीसह जिल्ह्यातील २५ धरणांमध्ये मिळून सुमारे १३१ टीएमसी (सुमारे ६० टक्के) पाणीसाठा झाला होता.

सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर तसेच पूर्व उतारावरील डोंगराळ भागात पावसाच्या सरीवर सरी येत असल्याने झरे, ओढे, नाले, नद्यांना पाणी आले आहे. पश्चिम भागात असलेल्या धरणांतील पाणीपातळीत सातत्याने वाढ सुरू आहे. काही धरणांमधून पाण्याचा विसर्ग करण्यात आल्याने उजनी, आणि घोड धरणाची पाणीपातळी उपयुक्त साठ्यात आली आहे. उजनी धरणामध्ये १०.५० टीएमसी उपयुक्त पाणीसाठा असून, अचल पातळीसह उजनीमध्ये तब्बल ७४ टीएमसीहून अधिक पाणीसाठा झाला आहे.

जिल्ह्यातील खडकवासला आणि कलमोडी धरण पूर्णपणे भरले आहे. येडगाव, चासकमान, वडिवळे, आंद्रा, पवना, कासारसाई, मुळशी, पानशेत आणि वीर धरणात ८० टक्क्यांहून अधिक पाणीसाठा झाला आहे. रविवारी चासकमान व खडकवासला धरणाच्या कालवा आणि सांडव्यातून प्रत्येकी सहा हजार क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात येत होते. वडज, कलमोडी, वडिवळे, कासारसाई आणि गुंजवणी धरणातूनही पाण्याचा विसर्ग सुरू होता. पुण्यातील बंडगार्डन येथे सुमारे साडेआठ हजार तर दौंड येथे भिमा नदीत सहा हजार क्युसेक वेगाने पाणी वाहत असल्याचे पुणे पाटबंधारे विभागातर्फे सांगण्यात आले.

सकाळ अॅग्रोवन
आयोजित
महाधन नजर ठेवा उद्यावर
प्रायोजित
अॅग्रोवन संवाद
'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद
कार्यक्रम वेळापत्रक
मंगळवार, २४ जुलै २०१८
विषय - ऊस उत्पादन वाढ तंत्रज्ञान
वक्ते - श्री. पद्मनाथ शिवाजी म्हस्के
(तालुका कृषी अधिकारी, श्रीगोंदा, अहमदनगर)
स्थळ - पेडगाव दत्त मंदिर सभागृह, ता. श्रीगोंदा, अहमदनगर
वेळ - सकाळी ८.३० वा.
या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.